# जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, वाशिम

नविन इमारत जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम, तळमजला, हॉल क्रमांक ०५ पिन ४४४५०५
ई – मेल :– dlsawashim@gmail.com फोन नंबर :– ०७२५२२३१४५५

जावक क्रमांक :४८४/२०२३
जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, वाशिम
दि :०९/०९/२०२३.

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी,
कार्यालय वाशिम.

विषय : – बातमी वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, दिनांक ०९/०९/२०२३ रोजी वाशिम जिल्हातील न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुषंगाने या पत्रासोबतची बातमी आपल्या अंतर्गत सर्व वर्तमान पत्रामध्ये प्रसारीत करण्याकरीता आपणाकडे पाठविण्यात येत आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (जिल्हा न्यायालय) वाशिम

आदेशान्वये

( सं. ना. भुरे )
अधिक्षक
जिल्हा विधि सेवा प्राधिकरण,
वाशिम

दिनांक :– ०९/०९/२०२३

# प्रेस नोट

## लोक न्यायालयात एकाच दिवशी १५१३ प्रकरणे निकाली

**वाशिम** : — मा. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण दिल्ली व मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांनी दिलेल्या निर्देशानुसार शनिवार दिनांक ०९ सप्टेंबर, २०२३ रोजी जिल्हयातील सर्व तालुका तसेच जिल्हा न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. माननिय श्री. आर. पी. पांडे अध्यक्ष, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वाशिम तसेच माननिय श्री. वि. अ. टेकवाणी, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम यांनी ज्या पक्षकारांचे प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत तसेच दाखल पुर्व प्रकरणे असलेल्या पक्षकारांनी आपले वाद सामोपचाराने कायमचे मिटविण्याकरीता लोक न्यायालयामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन केले होते.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये एका दिवसात वाशिम जिल्हयामध्ये न्यायालयात प्रलंबित असलेल्या **६३६९** तसेच दाखपुर्व प्रकरणे **६०९४** प्रकरणांपैकी प्रलंबित असलेल्या एकुण ११४१ प्रकरणांचा तसेच दाखल पुर्व 362 प्रकरणे असे एकुण प्रकरणांचा निपटारा करण्यात आला व एकुण रुपये 3,१९,८६,८१४/— ऐवढे रक्कमेचे प्रकरणे निकाली निघालीत. **तसेच लोक अदालतमुळे कौटुंबीक वादासंबंधीत प्रकरणांत कुटुंबे एकत्र येवुन नांदण्याकरीता सोबत गेले.**

राष्ट्रीय लोक अदालत यशस्वी होण्यामध्ये वकील संघाचे व जिल्हा पोलीस दलाचे देखील मोलाचे सहकार्य मिळाले.

आदेशान्वये

( स. ना. भुरे )
अधिक्षक
जिल्हा विधि सेवा प्राधिकरण,
वाशिम

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (जिल्हा न्यायालय) वाशिम

दिनांक :— ०९/०९/२०२३